**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – संजय राधाकिसन कासार

माझे वय ४५ वर्षे व्यवसाय शेती

राहणार शेरणखेल, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

१. दिनांक ३०.०३.२०१९ रोजी मी घरी असल्यामुळे कोठे काय घटना घडली, हे मला माहित नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविलेला नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने सहा.सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.०३.२०१९ रोजी रात्री ०८.१५ वाजताचे सुमारास मी, माझा मुलगा सुरज, माझी आई शांताबाई राधाकिसन कासार व भावजई सुशिला रामनाथ कासार असे आम्ही भाऊ रामनाथ कासार यांची मोटारसायकल क्र.एम.एच.१४–सी.आर.३१४७ हिचेवरुन वस्तीवरुन शेरणखेल गावात सप्ताह असल्याने सप्ताहासाठी जात असताना घराचे घराचे थोडे पुढे आलो असता किनई ओढ्याजवळ पाझर तलावाचे जवळ असताना माझे लक्षात आले की मी मोबाईल फोन घरी विसरलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी रोडचे कडेला मोटारसायकल उभी करुन मुलगा, आई व भावजई यांना तेथे उभे करुन पायी जवळच काही अंतरावर असलेल्या माझे घरी मोबाईल फोन घेण्यास आलो व त्यानंतर मी मोबाईल फोन घेऊन पुन्हा मुलगा, आई व भावजई हे थांबवले ठिकाणी सुमारे ०८.४५ वाजताचे सुमारास आलो असता मी पाहिले की, त्यांचा अपघात

झाला असून त्यांनी कोणी तरी धडकले आहे व त्यांना दुखापती झाल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे सदर अपघात पाहून थांबलेले माझे ओळखीचे पिंपळगाव नाकविंदा येथील इसम नामे मारुती हरीभाऊ काळे यांचेकडून आम्हास समजले की, त्यांनी सदर अपघात करुन जाणारी मोटारसायकल पाहिली असून ती मोटारसायकल बजाज प्लॅटीना मोटारसाकल क्र.एम.एच.१७–२०५८ ही होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा मुलगा, आई व भावजई यांना खाजगी वाहनातून अकोले येथील साबळे हॉस्पीटल येथे उपचारासाठी घेवून आलो. हे म्हणणे खरे नाही की, तेथील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी माझा मुलगा सुरज व आई शांताबाई यांना कुटे हॉस्पीटल, संगमनेर येथे पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, नंतर मला अपघातातील ती मोटारसायकल आरोपी गोविंद ज्ञानदेव वाळुंज हा चालवित होता व त्याचेकडून हा अपघात घडल्याचे समजले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझा जबाब नोंदविला.

३. आता मला जबाबातील पोर्शन मार्क 'अ' मधील मजकूर वाचून दाखविला. तो मजकूर मी पोलिसांना सांगितलेला नव्हता. पोलिसांनी तसा मजकूर का नमूद केला आहे, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये, म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–</u>**

४. नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.23 17:53:21 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – २३.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**